# 'कर्करोग प्रतिबंधासाठी महिलांमध्ये जागृती हवी'






**कर्करोग निदान आपल्या दारी या अभिनव उपक्रमाबाबत गोळपवासियांना मार्गदर्शन करताना डॉ. चैतन्य कोपीकर, महिलांकरता आयोजित उपक्रमाचा शुभारंभ करताना डॉ. सुनीता चव्हाण, सोबत रितू छाब्रिया आदी.**

▶ रत्नागिरी *(वार्ताहर)*

कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना त्याचा सामना करण्यासाठी महिलांनी सजग रहावे, तसेच कर्करोगासंदर्भात अन्य महिलांमध्येही जागृती निर्माण करावी, असे आवाहन जागतिक पातळीवर कॅन्सरवर काम करणारे तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले. फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे आयोजित कर्करोग आपल्या दारी उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशन, पुण्यातील प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरीत 'कर्करोग निदान आपल्या दारी' हा उपक्रम राबवण्यात आला होता. १७ ते २० डिसेंबर या कालावधीत गोळप व परिसरातील महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन चिरायु हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुनिता चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले. प्राथमिक अवस्थेतील कर्करोगाबाबत महिलांनी दक्षता बाळगल्यास या रोगाचा पूर्णपणे प्रतिबंध करता येतो असे सुनिता चव्हाण यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला डॉ. रमेश चव्हाण, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांच्यासह प्रशांती केअर मिशनच्या संचालिका लालेह गुशेरी उपस्थित होत्या. लालेह गुशेरी या आपल्या तज्ज्ञ डॉक्टर्सच्या टीमसह अद्ययावत तपासणी उपकरणे असलेली व्हॅन घेऊन या उपक्रमाकरता आल्या होत्या. फिनोलेक्स कॉलनीत तसेच पंचक्रोशीतजाऊन तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाला फिनोलेक्सच्या गोळप कॉलनीच्या महिला मंडळाचे महत्वाचे सहकार्य मिळाले. यावेळी रक्षंदा अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस. एस. मठ, ए. बी. अत्रे, गौरी क्षीरसागर, अभिषेक साळवी उपस्थित होते.

## फिनोलेक्स देणार मेमोग्राफी मशीन

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायु हॉस्पिटल येथे स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे निदान केंद्र सुरु करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याकरीता लागणारे मेमोग्राफी मशीन फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडतर्फे प्रदान करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन गेल्या काही वर्षांपासून दरवर्षी रत्नागिरी व आजुबाजूच्या गावात प्राथमिक आरोग्य शिबीर आयोजित करत आहेत. यावेळी ११ व्या प्राथमिक आरोग्य शिबिरात कर्करोग निदान शिबिराचा समावेश करून फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन स्त्रियांच्या आरोग्य समस्या सोडवण्यावर भर देत आहे.